# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/६७८ /२०१५

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ क्र.परीक्षा/निकाल कक्ष/५४३/२०१५ दि. २८ जुलै, २०१५. अन्वये ऑक्टो/नोव्हें २०१५ परीक्षेसाठी ज्या शिक्षणक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज M.K.C.L या अभिकरणामार्फत Digital University Portal वरून Online घेण्यात आलेले आहेत; या संदर्भात असे निदर्शनास येते की,

या परीक्षांसाठी महाविद्यालयांकडून प्रविष्ठ केलेली विद्यार्थी संख्या व महाविद्यालयांकडून या प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे विद्यापीठाकडे जमा झालेले परीक्षा शुल्क याच्यामध्ये तफावत आहे. ते म्हणजे प्रविष्ठ झालेले विद्यार्थी संख्या जास्त व प्राप्त झालेले परीक्षा शुल्क कमी आहे.

तरी याबाबत पुन:श्च असे कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा केले नसेल किंवा अनावधानाने जमा करणे बाकी राहून गेले असेल अशा सर्व महाविद्यालयांनी हे बाकी असलेले/राहून गेलेले परीक्षा शुल्क दि. २६ नोव्हेंबर, २०१५ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा करावे. असे न झाल्यास ज्या महाविद्यालयाकडून परीक्षा शुल्क येणे बाकी आहे अशा महाविद्यालयांकडून या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील व संबंधित महाविद्यालयास संभाव्य दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेली विद्यार्थी संख्या व या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेले परीक्षा शुल्क या सबंधिचे सर्व दस्तावेज पडताळणी कामी तयार ठेवण्यात यावा व परीक्षा विभागाकडून पडताळणी कामी मागणी करण्यात आल्यावर त्वरीत उपलब्ध करून देण्यात द्यावा.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(दीपक वसावे)
स्था.परीक्षा नियंत्रक

मुंबई — ४०००९८
दि. ०९ नोव्हेंबर, २०१५

प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव